‘रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास’
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखीय समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी
सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा

संशोधन आराखडा (Synopsis)

: संशोधक :

वर्षा रतन सावळे

एम. ए. समाजशास्त्र

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. पांडुरंग रा. मुट्ठे

एम.ए., एम.फिल., पी.एच.डी.
संशोधन मार्गदर्शक, समाजशास्त्र विभाग प्रमुख
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

: संशोधन केंद्र :

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

जुन - २०२५

'रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास'
(विशेष संदर्भ लातूर जिल्हा)

प्रस्तावना :-

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन या मूलभूत गरजा आहेत. निवारा या मूलभूत गरजेसाठी मानवाकडे पक्के घर असणे आवश्यक आहे. घर ही मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाची बाब झालेली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या वतीने विविध आवास योजनांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना आर्थिक सहाय्यता करण्यात येत असते. नागरिकांसाठी विविध प्रकारच्या आवास योजना राबविल्या जातात. त्यामध्ये केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना, इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण आवास योजना व राज्य शासन पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना इ. गृहनिर्माण योजना राबविल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून पक्क्या घराचे बांधकाम करण्यासाठी आर्थिक स्वरूपात मदत करणे, पक्के घर निर्माण करणे, झोपडपट्या कमी करणे, परवडणारी घरे उपलब्ध करून देऊन वंचित, दुर्बल घटकांचे राहणीमान सुधारणे. शहरी आणि ग्रामीण भागांसाठी भौगोलिक परिस्थितीनुसार, आर्थिक निकषानुसार, प्रवर्गानुसार, गरजेनुसार वेगळ्या योजना आहेत. या विविध आवास योजनांच्या माध्यमातून गरजू बेघरांसाठी, कच्च्या घरात राहण्यासाठी, दुर्बल व वंचित लोकांसाठी पक्के घरकुल बांधून देणाऱ्या तसेच बांधकामासाठी आर्थिक सहाय्य करणाऱ्या या योजना संपूर्ण देशात लोकप्रिय झाल्या. या योजनांमुळे पक्क्या घरांची उपलब्धता लक्षणीयरीत्या वाढली आहे, यामुळे याप्रकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची सामाजिक-आर्थिक असमानता कमी झाली आहे.

गावांकरिता किंवा शहरांकरिता निश्चित केलेल्या घरकुलांची संख्या तुलनेने मात्र कमी आहे अशा परिस्थितीत शहरी भागात व गावोगावी अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबाची संख्या बरीच जास्त आहे त्यामुळे सदर योजनेमुळे अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांना आवश्यक तो प्राधान्य क्रम मिळू शकत नव्हता, परिणामी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील बेघर व्यक्तींना स्वतःच्या मालकीचे घर उपलब्ध व्हावे यासाठी रमाई आवास योजना (ग्रामीण व शहरी) सुरू करण्यात आली.

संशोधकाने संशोधनासाठी 'रमाई आवास घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास' (विशेष संदर्भ : लातूर जिल्हा) या विषयाचा संशोधनात्मक अभ्यास करण्याचे ठरविले आहे. सदर योजनेच्या लाभार्थ्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने ज्या घटकांसाठी ही योजना राबविली जाते त्या ग्रामीण व शहरी भागातील योजनेचे लाभार्थी, शासकीय कर्मचारी व अधिकारी या सर्वांकडून माहिती संकलित केली जाणार आहे. विशेषता या योजनेचा ज्या घटकांना लाभ मिळालेला आहे अशा लाभार्थ्यांकडून प्रश्नावली व मुलाखती द्वारे माहिती मिळवून लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास केला जाणार आहे. सदर अभ्यास हा शासनाच्या रमाई आवास योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या सामाजिक जीवनात झालेल्या चांगल्या वाईट परिणामांचा शोध घेण्यासाठी महत्त्वाचा ठरेल.

संशोधन विषयाची निश्चिती :-

मानवाच्या सर्वांगीण विकासात निवाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. ग्रामीण व शहरी भागाच्या विकासाच्या प्रक्रियेत या प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागामध्ये निवाऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविल्या जातात. त्यामध्ये रमाई आवास योजनेचाही समावेश आहे परंतु, या योजनेचा प्रत्यक्ष फायदा लाभार्थ्यांना कशा प्रकारे झाला आहे व होत आहे याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे.

सरकारने राबविलेल्या अनेक गृहनिर्माण योजनांपैकी महाराष्ट्र शासनाची 'रमाई आवास योजना' ही अनुसूचित जाती व नवबौध्दासाठी आहे. भारतासारख्या देशाचा सद्य स्थितीमध्ये विचार केला तर अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या लोकांचे राहणीमान त्याचप्रमाणे त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसल्याचे दिसून येते. या समाजातील ठराविक मोजक्याच लोकांनी आर्थिक प्रगती केल्याचे दिसून येते. याचा अर्थ असा की, मोठ्या प्रमाणावर या समाजातील लोक अजूनही ग्रामीण भागात गावाच्या एका बाजूला गावकुसावर व शहरी भागात झोपडपट्टीमध्ये अनाधिकृत जागांवर तात्पुरत्या स्वरूपात ताबा घेवून अतिशय साध्या पध्दतीने कच्च्या प्रकारच्या घरामध्ये राहत असल्याचे दिसून येते. अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची त्याचप्रमाणे रस्ते, वीज, आरोग्य, सांडपाण्याची व्यवस्था, शिक्षणाच्या सुविधा इत्यादी सुविधांचाही अभाव दिसून येतो. पक्क्या स्वरूपाचा निवारा म्हणजेच घर बांधण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी या समाजातील लोकांकडे आर्थिक पाठबळ किंवा क्षमता नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जाती व

नवबौध्द कुटुंबे मोठ्या प्रमाणावर आपले वास्तव्य तात्पुरत्या ठिकाणावर करत असल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम मानवी कार्यक्षमतेवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पडत असल्याचे दिसून येते. अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुबांतील लोकांचे राहणीमान उंचवावे. त्यांच्या निवऱ्याचा प्रश्न सुटावा, यासाठी 'रमाई आवास योजना' सुरू करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या जागेवर डोंगराळ भागात व ग्रामीण भागात २६९ चौ. फुटाचे आणि शहरी भागात ३२३ चौ. फुटाचे पक्के घर या योजनेअंतर्गत बांधून देण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. सदरच्या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करून या योजनेचा फायदा अनुसूचित जाती व नवबौध्द समाजासाठी किती प्रमाणात होतो किंवा नाही याबाबतचा अभ्यास करणे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. महाराष्ट्र शासनाच्या रमाई आवास योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे.

२. अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३. रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

४. रमाई आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांना येणाऱ्या समस्या शोधणे.

५. रमाई आवास योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

६. रमाई आवास योजनेची अधिक प्रभावीपणे व परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

गृहितके :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती लक्षात घेता, संशोधन करताना पुढील गृहितकांची मांडणी करण्यात आलेली आहे.

१. रमाई आवास योजनेमुळे लाभार्थ्यांच्या पक्क्या घराच्या स्वरूपाने निवारा ही मूलभूत गरज पूर्ण झाली आहे.

२. रमाई आवास योजनेच्या विविध अटी व शर्तीमुळे अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील गरजू लोकांना या योजनेचा लाभ मिळत नाही.

३. रमाई आवास योजनेची प्रशासकीय स्तरावरील अंमलबजावणी योग्य पद्धतीने, जलद गतीने करण्यात येते.

४. रमाई आवास घरकुल योजनेच्या मिळणाऱ्या लाभात वाढ करण्याची गरज आहे.

पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा :-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनापूर्वी अन्य संशोधकांनी देशात राबवल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या आवास योजनांचा अभ्यास करून संशोधन कार्य केलेले आहे. तसेच काही संशोधकांनी रमाई आवास योजनेच्या अनेक पैलुसंदर्भात संशोधन कार्य केलेले आहे. त्या संशोधकांचे, लेखकांचे काही संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच अन्य लेखकांनी लिहिलेल्या अनुवादीत आणि संपादित केलेल्या पूर्वसंशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदरील संशोधनात रमाई आवास योजनेतील लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास यावर प्रकाश टाकण्यात आलेला नसल्यामुळे प्रस्तुत विषयाच्या संशोधनात वेगळेपणा असलेला आढळून येतो.

संशोधन क्षेत्र :-

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांसाठी असलेल्या विविध योजनांपैकी फक्त रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास संशोधकाने करण्याचे ठरवले आहे. संशोधकाने रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा अभ्यास करण्यासाठी लातूर जिल्ह्याची निवड केलेली आहे. प्रस्तुत संशोधनकार्य लातूर जिल्ह्यातील लातूर, औसा, निलंगा, शिरूर अनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर, रेणापुर या दहा तालुक्यांमध्यील रमाई आवास योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या गावात जाऊन संशोधन कार्य करण्यात येणार आहे. याचाच अर्थ असा की प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाचे भौगोलिक क्षेत्र हे संपूर्ण लातूर जिल्हा आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना गुणात्मक आणि संख्यात्मक संमिश्र संशोधन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा अवलंब केला जाणार आहे.

अ) तथ्य संकलन

तथ्य संकलन ही संशोधन पध्दतीची महत्त्वाची अट आहे. कारण त्या तथ्यांच्या आधारावर निष्कर्ष मांडले जातात. हे तथ्य संकलन प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोताच्या आधारे केले जाते.

१) प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी रमाई आवास योजनेच्या लाभार्थी यांच्या मुलाखती, प्रश्नावली, गृहभेटी या माध्यमातून प्राथमिक तथ्ये, साधने मिळवली जाणार आहेत.

२) द्वितीय स्त्रोत :-

द्वितीय स्त्रोतामध्ये संशोधन विषयाशी निगडित भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांचे अध्यादेश, शासन निर्णय, प्रकाशने, आर्थिक सर्वेक्षण पाहणी अहवाल, वार्षिक अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, शोधप्रबंध, शोधनिबंध, संदर्भग्रंथ, तसेच पूर्व संशोधित साहित्याचा वापर करण्यात येणार आहे.

ब) विश्लेषण पध्दती :-

संशोधनासाठी संशोधक जी तथ्ये संकलित करतो ती, पूर्वग्रह किंवा अस्पष्ट विस्तृत व अवास्तव स्वरूपाची असतात, अशा विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठिण असते. तथ्यांचे विश्लेषण सुलभतेने होण्यासाठी व समजण्यासाठी तथ्यांचे गट पाडणे किंवा श्रेणीकरण करणे. तथ्यांचे विश्लेषण सुलभ व्हावे यासाठी समान व असमान बाबी कोणत्या आहेत हे निश्चित करून, निश्चित प्रकार निवडावे लागतात. त्यामुळे विखुरलेले तथ्य एका निश्चित स्वरूपाच्या वर्गात किंवा श्रेणीत प्रस्तुत होऊ लागतात. म्हणून प्रस्तुत संशोधनात तथ्यांच्या वर्गिकरणाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाईल.

नमुना निवड प्रणाली :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी रमाई आवास योजनेचा लाभ घेत असलेले लाभार्थी, तसेच लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा यांची प्रस्तुत अभ्यासासाठी नमुना (Sample) म्हणून निवड करण्यात येईल. संशोधन कार्यक्षेत्रातील रमाई आवास योजनेचे लाभार्थी यांची संशोधन अध्ययनाच्या सोयीसाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील सोयीस्कर नमुना निवड या पध्दतीचा वापर करून निवडले जातील.

प्रकरण योजना :-

प्रस्तुत संशोधनाचा आराखड्याची पुढील प्रकरणांत विभागणी करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

या प्रकरणामध्ये रमाई आवास योजनेची पार्श्वभूमी, योजनेचे स्वरूप, उरिष्टे, योजनेच्या अंमलबजावणीची मार्गदर्शक तत्त्वे, घरकुल संदर्भात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेचे स्वरूप, अर्ज करण्याची पध्दत, कागदपत्रे, अर्ज छाननी व मंजूरीची पध्दत, अनुदान वितरण पध्दत, प्रशासकीय यंत्रणा व योजनेची अंमलबजावणी इ. बाबीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - संदर्भ साहित्याचा आढावा

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाशी निगडीत असणाऱ्या संदर्भ साहित्याचे अवलोकन ही करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनांसाठी वापरली जाणाऱ्या संशोधन पध्दतीचे सविस्तर विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - लातूर जिल्हा एक दृष्टिक्षेप

या प्रकरणात लातूर जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक, भौगोलिक, राजकीय आणि शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांचा अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या आधारे उपलब्ध असलेल्या माहितीचा आढावा घेऊन मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - तथ्य विश्लेषण व निर्वाचन

या प्रकरणामध्ये प्रस्तुत योजनेचे लाभार्थी कडून प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षणाद्वारे संकलित केलेल्या तथ्याचे सविस्तर विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण सातवे - निष्कर्ष व शिफारशी

प्राथमिक व दुय्यम माहिती संकलन पध्दत्तीतून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर योग्य निष्कर्ष काढण्यात येतील व अशा निष्कर्षाच्या आधारावर या योजनेतील लाभार्थ्यांच्या समस्यांना सोडविण्यासाठी शिफारशी सुचविण्यात येतील.

संदर्भ सूची :-

१. डॉ. आगलावे प्रदीप, ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर,२००२

२. रा. ना. घोटाळे, समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्त्वे, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००९.

३. डॉ. पुष्पा रानडे, 'प्राथमिक सांख्यिकी आणि संशोधन पध्दती', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, जुन २०१५.

४. प्रा. पु. ल. भांडारकर, संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९८१.

५. डॉ. आगलावे प्रदिप, 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर, जाने. २०००.

६. 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', लातूर जिल्हा, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७. योजना, मासिक, प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, महाराष्ट्र शासन

८. लोकराज्य, मासिक, प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, महाराष्ट्र शासन

९. https://www.india.gov.in

१०. https://www.maharashtra.gov.in

११. https://sjsa.maharashtra.gov.in

संशोधक

वर्षा रतन सावळे
एम. ए. समाजशास्त्र

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. पांडुरंग रा. मुट्ठे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ